आरोपींचा हजेरी माफीचा अर्ज निशाणी क्र. १३६ मंजुर करण्यात आलेला आहे. त्यांच्या ओळखीबाबत वाद नाही असे त्यामध्ये विद्वान विधीज्ञांनी नमुद केलेले आहे.

**तक्रारदारातर्फे साक्षिदार क्रमांक ०३ चे शपथेवर साक्ष सुरु**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :– | विशाल दिलीप सोनुने, |
| माझे वय | :– | ३६ वर्ष, |
| माझा व्यवसाय | :– | वनरक्षक, मिनझरी |
| राहणार | :– | मिनझरी, ता. चिमुर, जि.चंद्रपुर |

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. सी. आर. भोई यांच्या मार्फत.**

०१. घटना दि.०९/०४/२०१५ रोजी घडली होती. सदर दिवशी सकाळी ०७.३० वाजताच्या दरम्यान आम्ही गस्तीवर असतांना आम्हाला अवैध सागाचा तोडलेला थुट दिसला. त्याची चौकशी चालु केली व शोधाशोध केली. मग गुप्तहेरामार्फत कुठे गेला असेल काय केले असेल ही चौकशी सुरु केली. पांगळी–३ कंपार्टमेंट न.३२१ वाघडोंगरी या क्षेत्रात थुट आढळले होते. त्यानंतर समोरच्या कुकडहेटी तसेच पेठगाव कळमगाव टि–पाईंटवर गस्तीसाठी व सागाच्या झाडाचा शोध लावण्यासाठी नियतक्षेत्रातील सर्व कर्मचारी रात्री ७.०० ते ९.०० वाजताचे दरम्यान कर्तव्यावर होतो. एक इसम सागाची पाटी घेऊन कळमगाव गन्ना रोडच्या दिशेने चालला होता. आम्ही त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. त्याने अंधाराचा फायदा घेतला आणि तो पळुन गेला. सदर साग पाटी आम्ही पंचनामा व जप्तीपंचनामा करुन जप्त केली व जमा केली.

०२. दि.१०/०४/२०२५ साक्षीदार पुन्हा सांगतो की, २०१५ ला गुप्तहेरामार्फत आणखी चौकशी करण्याचा प्रयत्न केला. सागाच्या संदर्भात गुप्तहेरामार्फत माहिती मिळाली की, गळमगाव गन्ना येथील काही इसमांनी ते सागाचे झाड तोडलेले आहे आणि पाच पाट्या जामसाळा येथील चरणदास नावाच्या व्यक्तीला विकलेले आहेत. त्यानुसार कळमगाव गन्ना येथील कमलेश दौलत मेश्राम याला चौकशी साठी ताब्यात घेतले. त्याने सांगितल्यानुसार त्यासोबतचे इतर पाच लोक यांना पण ताब्यात घेतले. त्यांना झाडाबाबत विचारणा केली असता त्यांनी झाड तोडल्याचे घटनास्थळ दाखविले. इतर पाच पाट्या त्यांनी पाचशे रुपये

नगाप्रमाणे विकल्याचे कबुल केले व दाखवुन दिले. आता मला अभिलेखावरील निशाणी क्र. ५० वरील साग झाडाचे थुटांचा पंचनामा दाखविण्यात आला. पंचनामा तयार केल्याबाबतचा उल्लेख खरा आहे. सदरचा पंचनामा क्षेत्रसहाय्यक विजय येम्पलवार यांच्या समक्ष मी स्वतः तयार केलेला आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. आता मला अभिलेखावरील माझे बयाण दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. सदर बयाण क्षेत्रसहाय्यक कुकडहेटी श्री. विजय येम्पलवार यांच्या समक्ष नोंदविण्यात आलेले आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर बयाणाला **निशाणी क्र. १३८** देण्यात येते. मी प्रकरणातील आरोपींना ओळखतो. एकुण सात आरोपी आहेत. आज न्यायालयात चार आरोपी हजर आहेत.

**सरतपास संपला.**

**(आरोपीं क्र. १, ३, ४, ६ व ७ तर्फे साक्षीदाराचा उलटतपास विज्ञान विधीज्ञ नाकतोडे यांच्या मार्फत)**

०३. पंचनामा करते वेळी एकनाथजी रणदिवे आणि बंडु बातु कोटनाके हे दोन पंच होते. सदर पंचांना सुचनापत्र वैगेरे दिले नव्हते. साक्षीदार स्वतः सांगतो की, ते माझे अधिनस्त कर्मचारी होते. कक्ष क्र.३२१ चे क्षेत्रफळ ७९१.९८ असा काहीतरी आहे. सदर क्षेत्रफळामध्ये केवळ हा एकच थुट होता. साक्षीदार पुन्हा सांगतो की, संपुर्ण क्षेत्रफळात नाही, वाघडोंगरी भागात होता. वाघडोंगरी भागात किती सागाचे झाडे असतील हे मी सांगु शकत नाही. थुटाची गोलाई १४२ होती.

०४. हे म्हणणे खरे नाही की, दि.०९/०४/२०१५ रोजी मी गस्तीकामी कार्यरत असतांना एक सागाचा थुट आढळला व त्याचा पंचनामा केला होता हे मी खोटे सांगत आहे.

प्रश्न –पंचनामा तुम्ही किती वाजता सुरु केला. ?

उत्तर– सकाळचा टाईम होता.

०५. ७.३० ला सुरु केला. किती वाजता संपविला हे मी सांगु शकत नाही. माझे बयाण क्षेत्रसहाय्यक विजय येम्पलवार यांच्या समक्ष नोंदविण्यात आले. सदर बयाण १३ तारखेला नोंदविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, माझे बयाण १३ तारखेला विजय येम्पलवार यांच्या समक्ष नोंदविले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १, ३, ४, ६ व ७ यांच्याकडुन कोणताही वस्तु जप्त केली नाही. हे म्हणणे खरे

नाही की, मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे कोणताही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**(आरोपीं क्र. ५ तर्फे साक्षीदाराचा उलटतपास विज्ञान विधीज्ञ श्री. निकुरे यांच्या मार्फत)**

०६. हे म्हणणे खरे नाही की, दि.१०/०४/२०१५ रोजी गुप्तहेरामार्फत आरोपी चरणदास याला इतर आरोपींनी पाट्या विकल्याची माहिती मिळाली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी विरुध्द खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.** **फेरतपास काही नाही.**

दिनांक ३०/०३/२०२६.

सा.वा.दा.ब.अ.क.के.
PANDURANG ANKUSH GHOTE
Digitally signed by PANDURANG ANKUSH GHOTE
Date: 2026.03.31 11:51:15 +0530
(श्री. पा. अ. घोटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सिंदेवाही, जि. चंद्रपुर.

श्रवणोत्तर स्विकृत,
PANDURANG ANKUSH GHOTE
Digitally signed by PANDURANG ANKUSH GHOTE
Date: 2026.03.31 11:51:22 +0530
(श्री. पा. अ. घोटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सिंदेवाही, जि. चंद्रपुर.